वाचले:-

१. सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्र.साप्रवि/५/कावि/१६०४/२०२५, दिनांक ०२/०९/२०२५
२. क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील पत्र क्र. फक्षेका/आ/०४/कावि/७३७/२०२६ दि.०२/११/२०२६
३. महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ति वेतन नियम १९८२ मधील नियम १०(१).
४. अधिकार प्रदान आदेश क्रमांक साप्रवि/२/कावि/४५८/२०२६ दिनांक ०३/१०/२०२६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३/कावि/६३९/२०२६
दिनांक:- १८/ ११ /२०२६

विषय :- अधिसंख्य पदावर कार्यरत श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत,मुख्य आरोग्य निरीक्षक (सं.क्र. - 2338) यांना नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेबाबत..

आदेश,

श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत, यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर आरोग्य निरीक्षक या पदावर कोळी महादेव (अनुसूचित जमाती) या प्रवर्गाकरीता राखीव असलेल्या जागेवर आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/१२४१/१९९२ दि.०१/०९/१९९२ अन्वये वेतनश्रेणीत नियुक्ती देण्यात आलेली होती. ते दिनांक ०७/०९/१९९२ रोजी म.न.पा. त आरोग्य निरीक्षक पदावर रुजू झाले आहेत. त्यांचे महादेव कोळी या अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र, प्रमाणपत्र तपासणी समिती, यांनी अवैध ठरविले होते.

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक:बीसीसी२०१८/ प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१ डिसेंबर, २०१९ अन्वये दिलेले निर्देश विचारात घेवून, आदेश क्रमांक साप्रवि/३/कावि/१०४८/२०२४ दि.०९/०७/२०२४ अन्वये श्री. कांबळे पृथ्वीराज वसंत , यांची सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेली आहे.

श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत, मुख्य आरोग्य निरीक्षक पदावरील मुळ रुजू दिनांक ते सेवानिवृत्तीचे दिनांकापर्यंत (दिनांक ०७/०९/१९९२ ते दिनांक ३१/०१/२०२७) अखेर एकुण ३४ वर्ष ४ महिने इतके वर्ष सेवा झालेली आहे. तसेच अधिसंख्य पदावरील सेवा वर्ग करण्यात आलेली दिनांक०९/०७/२०२४ ते त्यांचे सेवानिवृत्तीचे दिनांक ३१/०१/२०२७ अखेर त्यांची सेवा २ वर्षे ६ महिने इतकी होत आहे. श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत, मुख्य आरोग्य निरीक्षक यांचे सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारिख २९/०१/१९६९ अशी असून दिनांक २८/०१/२०२७ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पूर्ण होत आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृति वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१) नुसार वर्ग ३ मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे ज्या शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना अधिसंख्य पदावर वर्ग केले आहे अशा अधिसंख्य पदावरील अधिकारी व कर्मचारी यांना सेवा विषयक तसेच सेवा निवृत्तीचे लाभ

देण्याबाबत वाचले क्र.१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

मा. क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रिय कार्यालय यांनी पत्र क्र. फक्षेका/आ/०४/कावि/७३७/२०२६ दि.०२/११/२०२६ अन्वये श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत, मुख्य आरोग्य निरीक्षक यांचेकडून मनपाचे घरकर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहनकर्ज, वैद्यकीय अग्रीम, कामगार कल्याण निधी कर्ज,सोसायटी कर्ज येणे बाकी नाही. तसेच सद्यस्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही. असा अहवाल सादर केला असून, त्यांना दि.३१/०१/२०२७ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस शिफारस केली आहे.

सबब, मी, सहाय्यक आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, प्रकरणी क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील दिनांक ०२/११/२०२६ रोजीचा अहवाल, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृति वेतन) नियमातील उक्त तरतूद विचारात घेऊन, मला उपरोक्त वाचले क्रमांक ४ वरील आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत, मुख्य आरोग्य निरीक्षक यांना दिनांक ३१/०१/२०२७ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून अधिसंख्य पदावरुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देणेत येत आहे.

श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत,मुख्य आरोग्य निरीक्षक यांना निवृत्तिवेतन, सेवा-उपदान इ.रकमा अदा करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता संबंधित विभागाने करुन प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सत्वर लेखा विभागाकडे पाठवावे. लेखा विभागाने श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत, मुख्य आरोग्य निरीक्षक यांचेकडून महापालिकेस येणे-देणे रकमांची खातरजमा करावी व त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास, ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करुन अंतिमत: देय रक्कम त्यांचे सेवानिवृत्तिचे दिनांकास अदा करावी. त्याचप्रमाणे लेखा परीक्षणार्थ येणे रक्कम निघाल्यास ती श्री. कांबळे पृथ्वीराज वसंत यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत, मुख्य आरोग्य निरीक्षक यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

Digital Signature
Signature Valid
Name : AJINKYA YE
Designation:Assistant Commissioner
Location:.
Date :18-11-2026 20:27

प्रती - 1) श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत, मुख्य आरोग्य निरीक्षक

प्रत - 1) १) लेखा विभाग २) मु.ले.प. ३) प्रशासन टे.क्र. ७,१०,१२.२० प्रशा- संगणक कक्ष ४) दुरसंचार ५) विद्युत ६) कामगार कल्याण ७) पिं.चि.म.न.पा.सेवकांची पतसंस्था ८) पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ ९) फ क्षेत्रिय कार्यालय २/- सोबत श्री.कांबळे पृथ्वीराज वसंत, मुख्य आरोग्य निरीक्षक यांचे सेवानोंद पुस्तक आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.